REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X

VOLUME - 8 | ISSUE - 7 | APRIL - 2019

# पोटमारा : एक आकलन




प्रा. डॉ. शारदा वामन मोरे
गंगामाई एज्युकेशन ट्रस्टचे कला, वाणिज्य
आणि विज्ञान महाविद्यालय, नगाव, ता. जि. धुळे.

## प्रास्ताविक :–

भारत हा खेड्यांचा देश आहे. भारताचा आर्थिक पाया कृषी व्यवसायावर उभा आहे. जवळजवळ 70–75 टक्के लोक खेड्यात राहतात. ह्या खेड्यात म्हणजेच ग्रामीण भागात राहणाऱ्या लोकांचा शेती हा मुख्य व्यवसाय आहे. निसर्ग व ग्रामीण माणूस यांचा अतूट संबंध आहे. खेडेगावात शेतीबरोबरच शेतीशी निगडीत व्यवसाय करणारेही लोक राहातात. ग्रामीण भागात शेतीव्यवसाय महत्त्वाचा असल्याने शेतकऱ्याला निसर्गकृपेवर अवलंबून रहावे लागते. या ग्रामीण माणसाचे जगणे, त्यांची रुढी, परंपरा, त्यांचे सांस्कृतिक जीवन, सामाजिक जीवन हे शहरी माणसाच्या जीवनापेक्षा निराळे व वैविध्यपूर्ण आहे. महात्मा गांधीजींच्या 'खेड्याकडे चला' या प्रेरणेने लेखकांचे लक्षही ग्रामीण भागाकडे केंद्रित झाले आहे. सामाजिक व वाङ्मयीन चळवळींचाही प्रभाव साहित्यावर पडलेला दिसून येतो. त्याचाच परिणाम म्हणून 1960 नंतरचे वाङ्मयीन साहित्यप्रवाह निर्माण झाल्याचे दिसते. स्वातंत्र्योत्तर काळात दलित, ग्रामीण, आदिवासी, जनवादी, मुस्लिम, ख्रिस्ती, स्त्रीवादी, मार्क्सवादी साहित्यप्रवाह उदयास आल्याचे दिसते.

ग्रामीण माणूस, त्याचे जगणे, त्याचा गोतावळा, ग्रामसंस्कृती, लोकपरंपरा, लोकसमजूती, लोकरुढींबरोबर ग्रामीण समस्या, ग्रामीण प्रश्न, ग्रामीण दुःख, ग्रामीण जाणिवा, शोषण या सर्वांची मांडणी ग्रामीण साहित्यातून दिसू लागली. ग्रामीण समस्या व प्रश्नांना वाचा फोडण्याची ठाम भूमिका ग्रामीण साहित्याची दिसून येते. म्हणून स्वातंत्र्योत्तर कालखंडात मराठी साहित्यप्रवाहापैकी ग्रामीण साहित्य हा एक महत्त्वाचा प्रवाह मानला जातो.

कादंबरी हा वाङ्मयप्रकार व्यापक स्वरूपाचा असल्याने त्यात मानवी मनाचा व जीवनाचा वास्तवतापूर्ण कलारूप वेध घेता येतो. म्हणून ग्रामीण कादंबरीत ग्रामीण मनाचा, लोक जीवनाचा वेध घेण्यात आला आहे.

ग्रामीण कादंबरीचा विचार केला तर 1888 मधील 'वळीबा पाटील' (भालेकर) आणि 1903 मधील 'पिराजी पाटील' (धनुर्धारी) ह्या कादंबऱ्यांपासून ते आजची रवींद्र पांढरे यांच्या 'पोटमारा' या कादंबरीपर्यंत जवळजवळ 100 ते 120 वर्षांची परंपरा ग्रामीण कादंबरीला लाभलेली आहे. श्री. म. माटे, ग. ल. ठोकळ, र. वा. दिघे, वि. वा. हडप पासून ते आनंद यादव, रा, रं, बोराडे, वासुदेव मुलाटे, बाबाराव मुसळे, पुरुषोत्तम बोरकर त्यानंतर राजन गवस, प्रतिमा इंगोले, सदानंद देशमुख, कृष्णा खोत असे अनेक सृजणशील व संवेदनशील लेखकांनी ग्रामीण कादंबरी लिहिल्या. यात ग्रामीण जीवन, गावागावातील चालीरिती, दुष्काळाने होरपळलेले गाव, गाव पाटलाची भूमिका, गावागावातील संबंध, वैर त्यानंतर खेड्यातील वास्तव चित्रण, त्यांचे दुःख, दारिद्र्य चित्रीत झालेले दिसते. शेतकरी हा कादंबरीच्या केंद्रस्थानी येऊ लागला. त्याचे कष्टकरी, श्रमकरी जीवनावर लिहिले जाऊ लागले. त्यानंतर ग्रामीण समस्या स्पष्ट होऊ लागल्या. ग्रामीण भागातील पाणीप्रश्न, ग्रामीण सुशिक्षित बेरोजगार, खेड्यातील राजकारण, ग्रामीण स्त्रीचित्रण, कर्जबाजारी शेतकरी, कोरडवाहू शेतकरी, बागायती शेतकरी, निवडणुकीची पद्धत, पैसे व शिफारसी मागणाऱ्या शिक्षण संस्था, शेतकऱ्यांची आत्महत्या असे प्रश्न ग्रामीण कादंबरीत येऊ लागले. यातीलच रवींद्र पांढरे यांची मन सुन्न करणारी शेतकरी तरुणाची करूण कहाणी मांडणारी कादंबरी 'पोटमारा' ही होय.

लिलाबाई विधवा स्त्री. लीलाबाईला दोन मुलं इका आणि पका. इका आठवीतूनच शाळा सोडतो कारण आईला शेतीकामात मदत करतो तर लहान पका शाळा शिकतो. पका सुट्यांमध्ये शेतीकामात मदत करतो. शिकून नोकरी करावी म्हणजे शेतीला नोकरीची जोड मिळेल असे त्याला वाटते. आईला समजवतो. एम. ए. बी. एड् पर्यंत शिक्षण घेऊन पका नोकरी शोधतो. तेव्हा विनाअनुदानीत शाळेमध्ये बिनपगारी नोकरी मिळते. पण त्यासाठी एक लाख रुपये डोनेशन भरावे लागणार असते म्हणून पका ते नाकारतो. टेंभुर्णीची कस्तुराबाईला अपल्या माहेरचा पका एम. ए. बी. एड्, झाल्याचे कळते तेव्हा तिला आपल्या मुलीसाठी शिकलेला मुलगा पका लायक आहे, असे वाटते. आपली मुलगी पुष्पा ही पायाने थोडी अधु आहे, परंतु पकाला आपल्या भावाच्या संस्थेत नोकरी लावून द्यावी आणि आपल्या मुलीचे लग्न पकाशी पक्के करावे. याच हेतूने कस्तुराबाई आपल्या भावाला गळ घालते की, पकाला त्याच्या संस्थेमध्ये शिक्षकाची नोकरी द्यावी तेव्हा भाऊ बाजिंदा पाटील होकार देतो परंतु जागा रिकामी नसल्यामुळे दोन वर्ष बिनपगारी सेवा करावी लागेल त्यानंतर जागा निघाली की, पकाला कायम करू, असे सांगतो. नोकरी मिळत असल्याकारणाने पकाही या विवाहाला होकार देतो. दोन वर्षानंतर शाळेमध्ये आमदार नागरे यांचा साडूला मुलाला नोकरी दिली जाते. कारण दिवटेअण्णा व बजिंदा पाटील यांना बाजार समितीची उमेदवारी व ग्रामपंचायतीच्या सरपंचपदाचे आमिष दाखवितात. पकाची नोकरी जाते आणि पका उदास मनाने शेतीकडे वळतो. त्यासाठी त्याला त्याचा मित्र समजवतो. पका शेतात मेहनत करू लागतो. पकाची ही अवस्था पाहून आई लिलाबाई धीर सोडते आणि त्यातच तिचा मृत्यू होतो. आपल्यामुळे आई गेली असे त्याला वाटते त्यामुळे अतिशय दुःखी होतो.

पुढे तो  पत्नी, भाऊ आणि मित्रांच्या प्रेरणेने चांगल्याप्रकारे शेती करू लागतो. शेतात विहिर खोदतो. त्यासाठी पत्नीचे बॅंकेतील पैसे वापरतो. विहिरीला चांगले पाणी लागलेले पाहून तो आनंदी होतो. इलेक्ट्रीक मोटर व पाईपलाईन करण्यासाठी त्याला कर्ज काढावे लागते. इलेक्ट्रीक मोटर व पाईपलाईन येतेही. पाणी शेतापर्यंत पोहचते. परंतु शेती पेरणी करण्यासाठी पैसे कोठून आणावे या चिंतेत असताना पत्नी पुष्पा आपल्या जवळचे दागिने देते. दागिने विकून पका शेतात मिरचीचे पीक लावतो. भरपूर उत्पादन आलेले पाहून पका सुखावतो. परंतु बाजारात मिरची विक्रीसाठी नेतो तेव्हा मिरचीला योग्य भाव मिळत नाही म्हणून तो दुःखी होतो. परंतु पुढील वर्षी तरी चांगला भाव मिळेल या आशेने दोघे पती–पत्नी पुन्हा कामाला लागतात व शेतामध्ये कपाशी, मिरची, घरापुरता लागणारा भाजीपाल्याची लागवड शेतात करतात. यावर्षी मात्र पाऊस धोका देतो. परंतु पकाच्या शेतात विहिर असल्याने तो निश्चिंत होतो. मात्र तरीही त्याच्या संकटांची मालीका संपतच नाही कारण विहिरीला पाणी असते परंतु लोड शेडींग असल्याने रात्रीच पाणी भरावे लागते. त्यातल्या त्यात एकेदिशवी डिपीच जळून जाते. तेव्हा गावातील 20 ते 25 शेतकरी प्रत्येकी 500/– रुपये जमा करून विजमंडळाच्या साहेबांना  नविन डिपी बसविण्यासाठी देतात. परंतु डिपी लगेच येत नाही व नविन डीपी बसून लाईट येईपर्यंत पक्याचे शेत उन्हाने करपून जाते. शेवटी उदास पका भरल्या विहिरीत स्वतःला झोकून देतो.

'पोटमारा' या कादंबरीचा अंत करूण आहे. 'पोटमारा' कादंबरीमध्ये शेतकरी असलेल्या सुशिक्षित बेरोजगार तरुणाची जीवनव्यथा आहे. शेतकऱ्याचे प्रश्न कमी न होता दिवसेंदिवस वाढतच जात असल्याचे दिसून येते. कोरवाडवाहू शेती असेल तर निसर्गावर अवलंबून रहावे लागते. बागायती असली तरी अनेक तांत्रिक अडचणींना सामोरे जावे लागते, हे ह्या कादंबरीतून दिसून येते.

ग्रामीण भागातील लोकांचा म्हणजेच शेतकऱ्याचा आजही शेतीव्यवसायावर विश्वास आहे व नितांत असे प्रेमही आहे. परंतु नव्या पिढीला हे कळून चुकले आहे की, नुसत्या शेतीवर विसंबून राहता येत नाही कारण शेती करतांना अनेक अडचणी येतात व खर्चही लागतो. तेव्हा शेतीबरोबर नोकरी असली तर खूप बरे असे आपल्याला आईला समजावतांना पका आंबेगावकर सरांचे उदाहरण देतो. आंबेगावकर सर म्हणतात, ''पोराहो, तुमच्यापैकी बरेच पोरं लहान–मोठ्या शेतक्रयांचे पोरं हायेती. शेतीले आपून माय म्हणतो. आपल्या पिढ्यान्‌पिढ्या मातीत राबत आल्या. अजुनबी राबातच हाये. तसं पाहयलं गेल्ह तं शेतीचं आपल्याले पिढ्यान्‌पिढ्या पोसत आली हाये. पण शेतीचं देणे कसं ? कधी कणभर तर कधी मनभर, लहान–सहान शेतकऱ्यांले तं लयकरून, अभावाचंच जिणं जगावं लागतं. मीठ  हाये तं मिरची नही, मिरची हाये त मीठ नही. हे आभावाचं जीणं नको पाहयचे आसील तं शिक्षनाची कास धरा, अर्ध्यातून शिक्षण सोडू नका. शिक्षण पुरं करा. शिक्षण पुरं करून लहानमोठी नवकरी करा. शेती तं हायेच. शेती आपली मायच. पण शेतीले नवकरीची जोड देल्ही तं आपली कोरडवाहू शेती बागायती

व्हयील.'' (पृ. 7) वरील आंबेगावकर सरांचे वाक्य पक्याला पटते. म्हणूनच शेतीबरोबर नोकरी हवीच, असे पका म्हणतो.

शेतकऱ्याची मुलं ओढून ताणून शिक्षण पूर्ण करतात. मात्र शिक्षण वा अन्य क्षेत्रात त्यांना डोनेशनशिवाय नोकरी नोकरी मिळणे कठिणच. पकालाही तोच अनुभव येतो. विना अनुदानित संस्थेत बिनपगारी नोकरी व अनुदानित संस्थेमध्ये शिफारस आवश्यक. शिफारस असूनही राजकीय डावपेचामुळे पका नोकरीपासून वंचीत होतो. राजकारणामुळे नातेगोते शुल्लक ठरतात हे देखील या कादंबरीतून दिसते. पकाच्या मामसाऱ्याला (चेअरमन) आमदाराकडून सरपंचपदाचे आमिष मिळाल्यामुळे तो पकाच्या जागी आमदाराच्या साडूच्या मुलाला लावतो. असे गलिच्छ राजकारण ग्रामीण भागामध्ये घुसलेले दिसते. ग्रामीण भागातील निवडणुकांनी हिडीस रूप कसं धारण केले आहे हे लेखकांच्या एका पुढील वाक्यातून दिसून येते. 'आरे आसे गड्डाच्या गड्डा मतं इकत भेट्याले लागले निवडणुकीत तं मंग मतदानाच्या हक्काला काय अर्थ उरतो ? काही म्हणा भो पैशाच्या बळावर एवढी मोठी लोकशाही लाचार, बटिक बनवून टाकली ह्या मुठभर सरंजामशाहीनं. घटनाकार बाबासाहेब आंबेडकर बिचारा बसलाशील आभायात डोक्याले हात लावून.''पृ.95.

'पोटमारा' या कादंबरीत शेतकऱ्याच्या जीवनाची हृदयद्रावक कहाणी आहे. शेतकऱ्याचे जीवन निसर्गाच्या लहरीपणावर अवलंबून असते. नुसता निसर्गाचा लहरीपणा त्याच्या दुःखाचे कारण राहिले नाही. राजकीय लोकांचे डावपेच, शिक्षण क्षेत्रातील भ्रष्टाचार, शिक्षणाचे अवमुल्य, ग्रामपंचायत ते बँका यांची लाच घेण्याची पद्धत, बिनपगारी शिक्षक, विनाअनुदानित शाळा या गोष्टींनी ग्रामीण माणसाला अक्षरशः त्रासून सोडले आहे. शेती कोरडवाहू असी ते दुःख, बागायती असली पण मालाला बाजारभाव नाही त्याचे दुःख, व्यापाराचे स्वार्थी धोरण या सर्व गोष्टींमुळे शेतकरी हवालदील झाला आहे. त्याची चहूकडून कोंडी झालेली दिसून येते.

ग्रामीण भागातील मुलांना शिक्षणाचे महत्त्व कळाले आहे. मात्र हे शिक्षण त्यांचे उदरनिर्वाहाचे साधन होवू शकत नाही. मुलींच्या बाबतीतही तसेच मुलींना शिकावं फक्त वाचणे लिहिण्यापुरतेच. शेवटी तिचे लग्न महत्त्वाचे. स्त्रीने घरदार सांभाळावे एवढेच. पुष्पाला शिकावेसे वाटते मात्र कस्तुराबाई तिचा विवाह करून तिला संसाराला लावते आणि यातच धन्यता मानताना दिसते. पका शिकूनही शेतात राब राब राबतो आणि देशप्रेमी (सुऱ्या) पदवीधर असून नोकरी न मिळाल्याने दारुच्या आहारी जातो. इका व दिना हे देखील शेतात काबाडकष्ट करणारे तरुण आहेत.

शेतात काम करणे म्हणजे नुसती मेहनतच असते असे नाही तर फार जोखिमीचे असते. याकडे लेखकाने लक्ष केंद्रित केले आहे. ''आरे भो दिना वावरातले काय जोखमीचेच राह्यता. सांभाळून अन् ध्यान दिवूनच करनं पडता. ऐकत नही आपून, कोन्हाचा बळतन तोडता तोडता झाडावरून पडून हातपाय मुडतो. कोन्हाले राती आंधाराचं भरनं करता साप चावतो, कोन्हाले इलेक्ट्रकच छाट लागतो. हायेच जिठी तिठी जोखिम, वावरात काम कऱ्याचं म्हणलं त आसे जीवघेणे परसंग कव्हा वाट्यावर येतील येचा नेम नाही. तरीबी करतच राह्यता शेतकरी शेतमजूर वावरात कामं डोळ्यावर कातडं वढून.''

'पोटमारा' कादंबरीतील स्त्री व्यक्तीरेखा बोलक्या व ठळक आहेत. यातील ग्रामीण स्त्री व्यवहारी, कष्टाळू, धाडसी आहे. दुःखाला सामोरी जाणारी, संकटांशी दोन हात करणारी आहे. विधवा असून हिमतीने शेती करणारी व मुलांचा सांभाळ करणारी लिलाबाई, नोकरीसाठी शेती गहाण ठेवू नये. असा व्यवहारी दृष्टिकोन ठेवणारी उषा, भावाला तडकाफड बोलणारी कस्तुराबाई व पकाच्या पाठीशी हिमतीने उभी राहणारी पुष्पा या स्त्री व्यक्तीरेखा अत्यंत उठावदार आहेत.

एकंदरीत 'पोटमारा' कादंबरीत शेतकऱ्याचे दुःख, दारिद्र्य, त्यांचे कष्ट, परिश्रम, सुशिक्षित बेरोजगार तरुण, कर्जबाजारी शेतकरी, ग्रामीण भागात फोफावणारा भ्रष्टाचार, शेतकऱ्याचे शोषण, पैशाला महत्त्व देणारी शिक्षणसंस्था, आधुनिक शेतीचे फायदे–तोटे, आर्थिक संघर्षात फरफटणारा तरुण यांचे वास्तव चित्रण 'पोटमारा' कादंबरीत आलेले आहे.

## निष्कर्ष :–

1. स्वातंत्र्योत्तर कालखंडात ग्रामीण साहित्यप्रवाह हा महत्त्वाचा प्रवाह मानला जातो.
2. ग्रामीण भागातील वास्तवचित्रण ग्रामीण कादंबरीद्वारे येऊ लागले.
3. 'पोटमारा' ही कादंबरी मन सुन्न करणारी कादंबरी आहे.

4. शेतकरी तरुणाची मनं सुन्न करणारी, करुण कहाणी मांडणारी कादंबरी म्हणजे 'पोटमारा'.
5. शोषित, वंचित शेतकऱ्यांना दु:ख गिळून रहावे लागते. अशा शेतकऱ्यांची कोंडी दर्शविणारी कादंबरी होय.
6. ग्रामीण सुशिक्षित बेरोजगार तरुण, ग्रामीण भागातील राजकारण, निवडणूक यांचे वास्तव चित्रण यात आले आहे.
7. या कादंबरीतील स्त्रीव्यक्तीरेखा कष्टाळू, मेहनती, व्यवहारी व धाडसी आहेत.

**संदर्भ :-**


1. रवींद्र पांढरे, ***'पोटमारा',*** लोकवामयगृह प्रकाशन, मुंबई, पहिली आवृत्ती, 2016.
2. डॉ. विद्या व्यवहारे, ***'साहित्य विमर्ष',*** चिनमय प्रकाशन, औरंगाबाद, पहिली आवृत्ती, 2003.
3. डॉ. रवींद्र ठाकूर, ***'मराठी ग्रामीण कादंबरी'*** स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, द्वितीया आवृत्ती, 2001.
4. डॉ. म. सु. पगारे (संपा.), ***'ग्रामीण दलित साहित्याचा अनुबंध',*** दिलीपराज प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, 2010.


LBP PUBLICATION